INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

29

Impact Factor - 3.452 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

December-2017

SPECIAL ISSUE-XXIV

## अभिरूची आणि बदलता वाचकवर्ग



अतिथी संपादक :
**डॉ. सुरेश बाकरे**
**प्राचार्य,**
**श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव,**
**ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर**

विशेषांक कार्यकारी संपादक :
**डॉ. गजानन कोर्तलवार**
**सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,**
**श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव,**
**ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर.**

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर (येवला )

**This Journal is indexed in :**
- University Grants Commission (UGC) List No. 40107 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 24 [illegible] आणि बदलता वाचक वर्ग December 2017
UGC Approved No. 40107 & 44117

## Editorial Board

**Chief Editor -**

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom of Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul.
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – M. S. G.College, Malegaon Camp, Dist- Nashik

---

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

---

**Published by -**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

RESEARCH JOURNEY


| अ. नं. | शोध निबंधाचे शीर्षक ........................................ लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **विभाग ४. - वाचन व अभिरुची यांचा सहसंबंध आणि वास्तव** | |
| २७ | बोलीभाषेविषयीची वाचकांची अभिरुची आणि वास्तव............................डॉ. अलका मटकर | १३६ |
| २८ | आजची युवा पिढी : वाचन आणि अभिरुची.....................................डॉ. तीर्थराज कापगते | १४० |
| २९ | वाङ्मयीन अभिरुची : स्वरूप,स्थित्यंतरे आणि समकालीन वास्तव............... डॉ. विजय रैवतकर | १४७ |
| ३० | वाचन व अभिरुची यांचा सहसंबंध आणि वास्तव.......................................डॉ. जयश्री शास्त्री | १५५ |
| ३१ | वाचन व अभिरुची यांचा सहसंबंध आणि वास्तव...............................प्रा. उपेंद्र चीटमलवार | १६० |
| ३२ | वाचन व अभिरुची यांचा सहसंबंध आणि वास्तव................................डॉ. राजकुमार मुसणे | १६३ |
| ३३ | वाचन व अभिरुची यांचे सहसंबंधातील मर्मबंध.............................. डॉ. धनराज खानोरकर | १६७ |


## UGC Journal Details


**Name of the Journal :** Research Journey

**ISSN Number :**

**e-ISSN Number :** 23487143

**Source:** UNIV

**Subject:** Marathi

**Publisher:** Swatidhan International Publication

**Country of Publication:** India

**Broad Subject Category:** Multidisciplinary


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

**Published by -**

❖ **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N.P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli

International Multidisciplinary E- Research Journal ISSN :
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676 (2013) 2348-7143
Special Issue 24 : अभिरुची आणि बदलता वाचक वर्ग December
UGC Approved No. 40107 & 44117 2017

# वाङ्मयीन अभिरुची : स्वरूप, स्थित्यंतरे आणि समकालीन वास्तव

प्रा. डॉ. विजय रैवतकर
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी
९८२३८७९२०६

वाङ्मयीन अभिरुची ही साहित्यव्यवहारातील निर्मिती आणि आस्वादाशी म्हणजेच व्यापक अर्थाने लेखक आणि साहित्यरसिक यांच्याशी संबंधित अशी संकल्पना आहे. **वाङ्मयीन अभिरुचीचे स्वरूप, स्थित्यंतरे आणि समकालीन वास्तव** या विषयाची मांडणी, अभिरुची या शब्दाचा अर्थ, वाङ्मयीन अभिरुची म्हणजे काय? वाङ्मयीन अभिरुचीचे स्वरूप, व्याप्ती आणि परिणाम करणारे घटक, वाङ्मयीन अभिरुचीची स्थित्यंतरे व समृद्ध परंपरा, समकालीन वाङ्मयीन अभिरुची आणि बदलते स्तर, वाङ्मयीन अभिरुची समृद्ध करण्यासाठी उपाययोजना, अशा मुद्द्यांच्या अंगाने केलेली आहे.

### अभिरुची या शब्दाचा अर्थ

व्यक्तीची आवडनिवड दर्शित करणारी विवेचक मन:शक्ती म्हणजे अभिरुची होय. अभिरुची या संज्ञेत अभि आणि रुची हे दोन प्रमुख शब्द. अभि म्हणजे विशेष व रुची म्हणजे आवड अर्थात अभिरुची या शब्दाचा शब्दश: अर्थ लक्षात घेता विशेष आवड, अधिक उत्कट किंवा आत्यंतिक आवड असा अर्थ प्रतीत होतो.

### वाङ्मयीन अभिरुची म्हणजे काय?

वाङ्मय विविध प्रकारांनी समृद्ध आहे. वाङ्मयात विविध आशयाच्या छटा आविष्कृत होतात. त्यात जीवननिष्ठा तसेच कलानिष्ठा अशाही बाजू आहेत. वाचक, रसिक यांच्या साहित्यास्वादप्रक्रियेत आणि लेखकाच्या साहित्यनिर्मितीविषयक प्रक्रियेत विशिष्टता असते. एकूणच त्यांची आवडनिवड दर्शित करणारी विवेचक मन:शक्ती म्हणजे वाङ्मयीन अभिरुची होय.

### वाङ्मयीन अभिरुचीचे स्वरूप, व्याप्ती आणि परिणाम करणारे घटक

वाङ्मयीन अभिरुचीचा लेखक आणि रसिक अशा दोन्ही अंगांनी विचार करावा लागतो. त्या त्या काळात परिणामकारक व लोकप्रिय ठरलेल्या साहित्यकृतींवरून रसिकाभिरुचीचा आणि लेखक काय सांगतो आणि कसे सांगतो यावरून लेखकाभिरुचीचा अंदाज बांधावा लागतो. वाङ्मयीन अभिरुची लेखकाभिरुची आणि रसिकाभिरुचीशी संबंधित संकल्पना आहे, हे सुरुवातीलाच स्पष्ट करावे लागते. वाङ्मयीन अभिरुचीत सर्जनशील वाङ्मयकृतींचा अभ्यास होत असल्याने वाचकांच्या जीवनाविष्कारातही भर पडत असते कारण वाङ्मयीन निर्मिती केवळ भावनिक पातळीवर राहत नाही तर ती वाचकाला बौद्धिक पातळीवरही घेऊन जात असते. वाङ्मयीन अभिरुचीचा प्रांत प्रकाशक, लेखक आणि वाचक यांच्यातील संवादी नात्यावरही बराचसा अवलंबून आहे.

अभिरुची ही मूलत: व्यक्तीची विवक्षित अशी जीवनदृष्टी असते. जीवनदृष्टी म्हणजे मूल्यदृष्टीच होय. समग्र जीवनातील इष्टानिष्टाचा विवेक करणारी सर्वंकष नैतिकता या शब्दातच अभिरुचीचे वर्णन करावे लागते. साहित्य हा समग्र जीवनाचा एक अविभाज्य भाग असल्याने साहित्यक्षेत्रातही इष्टानिष्टाचा साक्षेपी विवेक करणारी, मूल्यनिर्णय करणारी मन:शक्ती, असे वाङ्मयीन अभिरुचीचे स्वरूप असते.

Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli